
ISSN: 2393-8900 Impact Factor : 2.7825(UIF) Volume - 5 | Issue - 5 | January - 2019

Historicity researcH Journal

# रा. रं. बोराडे यांच्या चारापाणी या कादंबरीतील कृषीजीवन




**राजकुमार श्रीधर पवार**
**मराठी विभाग, श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा.**

## प्रास्ताविक

मराठी साहित्याच्या प्रवाहात स्वातंत्र्योत्तर कालखंडात जे वेगवेगळे साहित्य प्रवाह निर्माण झाले त्या साहित्य प्रवाहामध्ये ग्रामीण साहित्याचा प्रवाह हा सर्वांगांनी महत्त्वपूर्ण ठरणारा साहित्य प्रवाह आहे. या साहित्य प्रवाहात मराठी साहित्याच्या क्षितिजापासून दूर असलेल्या जीवन वास्तवाचे चित्रण मराठी साहित्याच्या केंद्रवर्ती आले. ग्रामीण जीवनातील विविध अनुभव अनेक लेखकांनी प्रत्ययकारीतेने वेगवेगळ्या साहित्य प्रकारातून अभिव्यक्त केले. ग्रामीण साहित्याच्या प्रारंभ काळातील एक पिढी सशक्तपणे ग्रामीण जीवनाचे विविधांगी पदर आपल्या लेखनातून मांडू लागली. या पिढीचे प्रतिनिधित्व करणारे महत्त्वाचे लेखक म्हणून रावसाहेब रंगनाथ बोराडे यांचे नाव आवर्जून घेतले जाते. बोराडे यांनी कथा कादंबरी नाटकांच्या माध्यमातून ग्रामीण जीवनातील विविधात्मकता मराठी साहित्यात प्रभावीपणे पुढे आणली. बोराडे यांचे लेखन ग्रामीण जीवनाशी एकरूप होऊन झालेले असल्यामुळे त्यांच्या लेखनातून ग्रामीण संवेदनशीलतेचे विविध भाव प्रभावीपणे अभिव्यक्त होतात. त्यांच्या एकूण लेखन विश्वातील 'चारापाणी' ही अत्यंत महत्त्वाची कादंबरी आहे. या कादंबरीतून ग्रामीण जीवनातील विशेषतः कृषीनिष्ठ जीवन जाणिवांचा प्रभावी अविष्कार झालेला आहे.

ज्या लेखकाच्या जाणीव समृद्ध असतात; त्या लेखकाचे जीवन अनुभव समाजाभिमुखतेतून साकार होतात. ग्रामीण जगण्याशी आणि तिथल्या एकूणच व्यवस्थेशी लहानपणापासूनच बोराडे जोडले गेलेले असल्यामुळे, त्यांचे लेखन या सभोवतालाच्या वास्तवाला कवेत घेऊन झालेले आहे. बोराडे यांनी बदलत्या ग्रामीण जीवन वास्तवाची दाहकता आपल्या लेखनातून प्रतिबिंबित केलेली आहे मराठवाडा या भौगोलिक प्रदेशातील जीवन वास्तवाला कवेत घेताना बोराडे यांनी या प्रदेशाला गिळंकृत करून पाहणाऱ्या दुष्काळ समस्येवर नेमकेपणाने प्रकाश टाकला आहे. या कालखंडात ग्रामीण जीवनाचे चित्रण करणारे लेखक ग्रामीण जीवनातील विविध प्रश्न प्रभावीपणे मांडत होते. बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणाने एकूणच मानवी जीवनावर विघातक परिणाम केला. या परिणामाचे वास्तव चित्र त्या कालखंडातील लेखकांनी प्रभावीपणे शब्दबद्ध केले. लेखक या समकालीन समाज वास्तवाला कशा पद्धतीन मांडत होते याविषयी भाष्य करताना द. ता.भोसले लिहितात, " ग्रामीण जीवनातील सर्व प्रकारची अभावग्रस्तता, शेतकऱ्यांचे दारिद्र्य, त्यांचे अज्ञान, त्यांचे होणारे शोषण, दुष्काळामुळे होणारी होरपळ, त्यांचा कर्जबाजारीपणा, त्यांचे शेती आणि जनावरावरील प्रेम, शेतमालाला न मिळणारा भाव,

चुलीपर्यंत पोहोचलेले राजकारण आणि गटातटाचे शत्रुत्व, कौटुंबिक परावस्था यासारखे शेतकऱ्यांच्या जीवनाचे लचके तोडणारे प्रश्न या लेखकांनी मनःपूर्वक आणि मनःप्रेरक स्वरूपात मांडले" १ भोसले यांनी ग्रामीण साहित्य प्रवाहाच्या पहिल्या आणि दुसऱ्या पिढीतील लेखकांनी आपल्या लेखनातून ग्रामीण जीवनात उद्भवलेल्या प्रश्नांना कशा पद्धतीने उभे केले ते स्पष्ट केले आहे. या परंपरेत बोराडे यांचे लेखन महत्त्वाचे ठरते.

विविध विषयावर कादंबरी लेखन करणारे बोराडे यांनी ग्रामीण जीवनातील शेतकऱ्यांच्या महत्त्वाच्या प्रश्नावर भाष्य करताना 'चारापाणी' या कादंबरीतून दुष्काळामुळे उद्भवलेल्या चारापाण्याच्या प्रश्नावर प्रकाश टाकलेला आहे. दुष्काळात सातत्याने चर्चा होते ती माणसांच्या जीवनात निर्माण झालेल्या प्रश्नांची. परंतु,माणसांबरोबरच विशेषतः शेतकऱ्यांबरोबरच त्यांच्या शेतीतला महत्त्वाचा असणारा घटक म्हणजे बैल होय. या मुक्या जनावरांच्या चाऱ्या पाण्याचा प्रश्न तेवढाच महत्त्वाचा आहे. परंतु त्या प्रश्नावर कोणीही गांभीर्याने किंवा कसल्याच प्रकारची चर्चा करत नाही. दुष्काळामुळे आपल्या जनावरांच्या वाताहतीने शेतकरी हवालदिल होतो. अशा शेतकऱ्यांच्या अंतर्मनातील भाव बोराडे यांनी आपल्या कादंबरीतून प्रभावीपणे शब्दबद्ध केले आहेत. म्हणूनच बोराडे यांची कादंबरी ही समकालीनामध्ये भिन्न ठरते. शेतकरी निसर्गावर अवलंबून असतो तसाच तो त्याच्या जनावरांवरतीही अवलंबून असतो. आपल्या जनावरांची होणारी वाताहत त्याला पहावत नाही. अस्मानी संकटाबरोबरच सुलतानी संकटाशीही शेतकऱ्याला तोंड द्यावे लागते याचेच प्रत्यंतर 'चारापाणी' या कादंबरीतून येते. 'चारापाणी' ही कादंबरी निसर्गावर आधारित असणाऱ्या शेतकऱ्याच्या जीवनाची मानवी मनोवृत्तीने केलेली वाताहत कशी टिकते याविषयी भाष्य करताना डॉ. रवींद्र ठाकूर लिहितात, " चारापाणी मराठवाड्यातल्या १९८५-८६ च्या दुष्काळी परिस्थितीचे चित्रण करणारी कादंबरी प्रसिद्ध झाली आहे. निसर्गावर अवलंबून असलेल्या शेतकरी जीवनाची दुर्दशा या कादंबरी चित्रित होते. बदलत्या परिस्थितीत शोषक समाज शोषणाची नवे तंत्रे शोधून काढतो. आबाराव शेळके यांनीही असेच केले आहे. सुखदेव त्यांच्याविरुद्ध संघर्ष देतो. परंतु शेवटी त्याच्या पदरी निराशा येते." २ ठाकूर यांनी या कादंबरीतून नैसर्गिक संकटाशी आणि मानवनिर्मित संकटाशी संघर्ष करणारा शेतकरी यांच्यातील द्वंद्व बोराडे कसे उभे करतात, हे स्पष्ट केले आहे.

'चारापाणी' ही कादंबरी एका वेगळ्या आणि महत्त्वाच्या विषयाला न्याय देणारी कादंबरी असल्यामुळे; ती त्या काळात वाचकांच्या आस्थेचा विषय झालेली होती. अनेकांनी या कादंबरीकडे अत्यंत गांभीर्याने पाहिलेले होते. या कादंबरीच्या निर्मितीनंतर अभ्यासक वाचकांमध्ये सातत्याने बोराडे यांच्या अभिव्यक्ती संदर्भात चर्चा झालेली होती. दुष्काळ हा मानवी जीवनाला होरपळून काढणारा असतो. दुष्काळात कृषी व्यवस्था कोलमडून पडते. दुष्काळाचे मानवी समाजावर होणारे विपरीत परिणाम सातत्याने चर्चिले जातात. परंतु, दुष्काळामुळे कृषी व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक असणाऱ्या जनावरांवरती होणाऱ्या परिणामांची मात्र चर्चा होत नाही. आणि त्याच महत्त्वाच्या विषयाला बोराडे आपल्या कादंबरीतून न्याय देण्याचा प्रयत्न करतात. या अनुषंगाने बोराडे यांची ही कादंबरी वेगळी ठरते. मेख मारो आंदोलन सारखे आंदोलन बरेच काही सांगून जाते. कादंबरीला प्रवाही ठेवण्यासाठी आलेली विविध पात्रे, घटना आणि प्रसंग कादंबरीच्या एकूणच कथानकात मौलिक स्वरूपाची भर टाकणारे आहेत. ही कादंबरी सर्वांगाने कशी महत्त्वपूर्ण ठरते, याविषयी भाष्य करताना डॉ. भीमराव वाघचौरे लिहितात, "ग्रामजीवन अधिकतर कृषीकेंद्रित असल्याने या कृषिकेंद्रित व्यवस्थेला आवर्षण सतत भेडसावत असते. या आवर्षणाचा परिणाम मानवी जीवनापेक्षा प्राणी जीवनावर अधिक होतो. आवर्षणामुळे निर्माण होणाऱ्या दुष्काळात माणसांना जगवण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न केले जातात. मात्र ज्यांच्या जगण्यावर शेतकरी जगतो आणि इतरांनाही जगवतो त्या त्याच्या मुक्या जनावरांचे, बैलांचे जीवन मात्र शासन मानवी जीवनाच्या मापाने मोजत नाही. परिणामी हे प्राणी जीवन धोक्यात येते आणि त्या निमित्ताने शेतकरीही धोक्यात येतो. या आवर्षणाच्या निमित्ताने बैल या घटकाला मुकलेला शेतकरी पुन्हा शेतकरी म्हणून उभा राहू शकत नाही.

चारापाणीचा आशय, विषय आणि आवाका याबाबत विचार करता; या लघु कादंबरीने अतिशय व्यापक आकलनातून हा प्रश्न हाताळला असे दिसते " ३ वाघचौरे यांनी या कादंबरीतून महत्त्वाच्या प्रश्नाला कसा न्याय दिला आहे ते स्पष्ट केले आहे.

जो लेखक आपल्या सभोवतालातील प्रश्नांना थेटपणे भिडतो, आपल्या जगण्याशी एकरूप होऊन त्या जगण्यातील विविध प्रश्नांची व्यापकता सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो, त्या लेखकाची कलाकृतीही बहुमूल्य ठरत असते. या अनुषंगाने बोराडे यांची ही कादंबरी महत्त्वाची वाटते. या कादंबरीच्या निर्मितीच्या मुळाशी असलेल्या भावना विचारात घेतल्या म्हणजे, संवेदनशील मनाचा लेखक समकालातील प्रश्नांशी कशा पद्धतीने भिडू पाहतो, हे प्रत्ययास येते. कादंबरीच्या अभिव्यक्ती संदर्भात बोराडे यांनी व्यक्त केलेले पुढील मत विचारात घेऊन त्यांची अभिव्यक्ती ही व्यापकतेचा परिपोष घेऊन कशी सिद्ध झाली होती, ते अधिक स्पष्ट करता येते. ते लिहितात, " चारा पाण्याची समस्या ही ग्रामीण भागातल्या पशुधनाच्या अस्तित्वाशी निगडित असलेली समस्या आहे. शेतकऱ्यांचे अस्तित्व विशेषतः कोरडवाहू शेतकऱ्यांचे अस्तित्व पशुधनाच्या अस्तित्वावर अवलंबून आहे. म्हणून या समस्यांकडे पुरेशा गांभीर्याने बघणे व वेळीच ही समस्या सोडविणे आवश्यक आहे. या कादंबरीत मी केवळ चारापाण्याची समस्या मांडलेली नाही, तर प्राप्त परिस्थितीत ही समस्या मांडण्यात व तिच्या सोडवणुकीचा मार्ग सुचविण्यात मी कितपत यशस्वी झालो हे केवळ मराठी वाचकांनीच नव्हे तर, शेती, पाणी आणि दुष्काळ या विषयांच्या अभ्यासाकांनीही ठरवायचे आहे. " ४ बोराडे यांनी आपण ही कादंबरी का लिहिली याविषयीचा जो निर्वाळा दिला आहे, त्यावरून असे लक्षात येते की, समकाळामध्ये उद्भवलेल्या या प्रश्नाने कृषी व्यवस्था गिळंकृत करू पाहिलेली आहे. या प्रश्नाला वाचा फोडली पाहिजे आणि त्यासाठी समाजातल्या सर्वच घटकांनी एकत्रित येणे आणि या दृष्टीने विचार करणे गरजेचे आहे. या भावनेतून ही कादंबरी निर्माण झाली आहे. त्यामुळेच या कादंबरीला वेगळेपण प्राप्त होते.

सरतेशेवटी सारांश रुपाने असे सांगता येते की, 'चारापाणी' या कादंबरीतून बोराडे यांनी समकालामध्ये उद्भवलेल्या अत्यंत जीवघेण्या प्रश्नावर प्रकाश टाकलेला आहे. मराठवाड्यातील कृषी जीवनाला विस्कळीत करणाऱ्या दुष्काळासारख्या समस्येमुळे कृषी जीवन ज्या घटकावर अवलंबून आहे त्या घटकाला न्याय देण्याचे काम बोराडे यांच्या चारापाणी कादंबरीतून झाले आहे. आजवर मराठी साहित्याने केवळ माणसांच्या जगण्याची चर्चा केली होती. परंतु या परंपरेला छेद देत बोराडे यांनी या कृषी व्यवस्थेची चर्चा करतानाच ही कृषी व्यवस्था ज्या घटकावर अवलंबून आहे त्या घटकाचीही दुष्काळामुळे होणारी वाताहत केंद्रस्थानी ठेवली आहे. या अनुषंगाने मराठी कादंबरीत विचार होणे गरजेचे आहे असे वाटते.

## संदर्भ :

१) द. ता. भोसले, साहित्य:आस्वाद आणि अनुभव, ग्रंथाली प्रकाशन मुंबई, प्र. आ. २०१२, पृष्ठ १३.

२) रवींद्र ठाकूर, ग्रामीण कादंबरी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्र. आ. १९९३, पृष्ठ १४५.

३) भीमराव वाघचौरे, रा. रं. बोराडे यांचे साहित्य स्वरूप आणि आस्वाद, विहित प्रकाशन औरंगाबाद, प्र. आ. १९९९, पृष्ठ १७२.

४) रा. रं. बोराडे, चारापाणी, साकेत प्रकाशन, औरंगाबाद मनोगत.